## निशाणी ६ खालील आदेश

(बबन यशवंत पाटील वि. महा.राज्य विद्युत वितरण कंपनी इस्लामपूर)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना बेकायदेशीरपणे दावा ब मिळकतीमध्ये वीज कनेक्शन देवू नये अशा तुर्तातुर्त ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी ५५ खाली व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी निशाणी ४५ खाली म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

२. वादीचे कथनाप्रमाणे, दावा अ मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची वडिलार्जित मिळकत होती. तथापि वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचे पूर्वहक्कदार यशवंत यांनी त्यांचे हयातीत दावा अ मिळकत व इतर वडिलार्जित मिळकती गट नंबर २३१ व २४६ यांचे वाटप केलेले होते. त्याप्रमाणे दावा अ मिळकतीपैकी ० हे. १४ आर वादीचे वाटपास देण्यात आले. तर उर्वरित ० हे. १५ आर प्रतिवादी क्र. ६ याचे वाटपास देण्यात आले. गट नंबर २३१ ही मिळकत प्रतिवादी क्र. ४ व ५ व प्रतिवादी क्र. ३ चे वडील यांचे वाटपास देण्यात आली. त्याप्रमाणे ज्याची त्याची ज्या त्या मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट चालू होती व आहे. तसेच वादी-प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची वडिलार्जित मिळकत गट नंबर २४६ ही जुनी विहीरपड क्षेत्र असून त्यामधील इतर हिस्सेदार यांचा हिस्सा वादीने नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी घेतला असून प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचा त्या मिळकतीमधील असणारा हिस्सा खरेदी करणेबाबत वादींनी नोटराईज्ड साठेखत केलेले होते.

३. वादी यांचे खरेदी मालकीची ऐतवडे बुद्रुक येथील शेत जमीन असून त्या मिळकतीस वादींना पाण्याची सोय नसल्यामुळे वादीने स्वतःचे खर्चाने दावा अ मिळकतीमध्ये त्यांचे असणा-या हिश्श्यात सन २०१३ साली विहीर खुदाई केली होती व आहे. त्याचा संपूर्ण हिस्सा एकट्या वादीने केलेला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचा कोणताही कसलाही संबंध नव्हता. त्या विहीरीवर वादी यांनी १२.५ हॉर्स पॉवरची पाण्यातील मोटर बसवून त्यांचे हिश्श्यात वीज कनेक्शनची मीटरपेटी देखील बसविली होती. तेव्हापासून विहीरीचा व त्यामधील पाण्याचा वापर वादी एकटेच करीत आहेत. त्या विहीरीबाबतची नोंद गट नंबर २४७ च्या सातबारा रेकॉर्डसदरी संबंधीत तलाठी यांनी केलेली होती. अशा प्रकारे वादीचे दावा मिळकतीमध्ये शांततामय कब्जे वहिवाट होती व

आहे.

४. वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचेकडून दावा ब मिळकतीमधील १ आणेचा हिस्सा दि. ०५/०९/२०१५ रोजी नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी केलेला आहे. वादी यांची सन २०१४- १५ साली देखील एकट्याचीच दावा ब मिळकतीची नोंद सातबारापत्रकी होती. तथापि सातबा-याच्या संगणकीकरणाच्या वेळेस वादीचे एकट्याच्या नावाच्या विहीरपडची नोंद कमी झाल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. ३ व ४ हे बेकायदेशीरपणे दावा ब मिळकतीवरील विहीरीवर वीज कनेक्शनची मागणी प्रतिवादी क्र. २ यांचेकडे करु लागले. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांना दि. ०५/०६/२०१७ रोजी वकिलांमार्फत दावा ब मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना वीज कनेक्शन देवू नये यासाठी नोटीस पाठविली होती. परंतु प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नोटीस मिळूनही प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे विद्युत कनेक्शनचे काम थांबविले नाही. म्हणून वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना बेकायदेशीरपणे दावा ब मिळकतीवर वीज कनेक्शन दिल्यास त्यांना वादीच्या मालकीच्या असणा-या विहीरीवर नसलेले हक्क प्राप्त होणार आहेत व त्यामुळे वादीचे कधीही पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. म्हणून वादीने प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कथनानुसार, गट नंबर २४७ मधील विहीरीवर विद्युत कनेक्शन मिळणेसाठी प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क्र. २ यांचेकडे सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन रितसर अर्ज दिला होता. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा ब मिळकतीमध्ये प्रत्यक्ष जावून पाहणी केली असता प्रतिवादी क्र. ३ यांस दावा ब मिळकतीमधील विहीरीवर विद्युत कनेक्शन देण्यास मंजुरी देवून दि. ३०/०६/२०१७ रोजी कोटेशनची रक्कम रु. १,६४६ /- इतकी प्रतिवादी क्र. ३ यांचेकडून भरुन घेतलेली आहे. दावा अ मिळकतीचा सातबारा उतारा पाहिला असता सदर मिळकतीच्या कागदोपत्री वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची समाईकात नोंद असलेचे दिसून येते. तसेच दावा अ व दावा ब मिळकत (विहीरपड क्षेत्र) यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची समाईकात कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येते. अशी परिस्थिती असता वादी यांना दावा ब मिळकतीमधील विहीरीवर प्रतिवादी क्र. ३ यांना विद्युत कनेक्शन न देणेबाबत मागणी करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही. सबब वादी यांचा दावा

व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज रद्द व्हावा अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

७. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यांस दावा अ मिळकतीच्या लगत असलेल्या त्यांच्या एकत्रीत कुटुंबाच्या मालकीच्या गट नंबर २४६ मधील विहीरीवर विद्युत कनेक्शन दिलेले आहे. गट नंबर २४६ मधील विहीरीतून सदर प्रतिवादी यांचे विद्युत कनेक्शन द्वारा वादी हे त्यांच्या अन्य शेतमिळकतीस पाण्याचा वापर करतात. दावा ब मिळकतीध्मये वादीस प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कधीही विद्युत कनेक्शन दिले नव्हते. तसेच दावा ब मिळकतीमध्ये वादी यांची वैयक्तीक मालकी असलेबाबत वादी यांना कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. अशी परिस्थिती असताना वादींनी दावा ब मिळकतीमध्ये वादीचे विद्युत मोटार, विद्युत वीजपेटी असलेबाबत खोटे कथन केलेले आहे. दावा ब मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची समाईकात मालकीची आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ यांस दावा ब मिळकतीमधील विहीरीवर विद्युत कनेक्शन घेता येते. अशाप्रकारे वादींना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ व४ यांना विद्युत कनेक्शन देवू नये अशी ताकीद मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. त्यामुळे वादी यांचा ताकीद अर्ज मंजूर झालेस अप्रत्यक्षरित्या प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे नुकसान होणार आहे.

८. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कथनानुसार, प्रतिवादी ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी असून विद्युत ग्राहकांना विज वितरीत करणे हे सदर कंपनीचे कार्य असून वीज ही अत्यावश्यक सेवा आहे. तसेच ७/१२ पत्रकी ज्यांची मालक व कब्जेदार अशी नोंद आहे त्या ग्राहकांना कागदपत्रांची सर्व पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी कंपनीस विद्युत कनेक्शन देणे भाग आहे. अशा रितीने प्रतिवादी क्र. ३ यांनी आवश्यक ती सर्व कागपत्रांची पुर्तता केल्यानंतर विद्युत कनेक्शनबाबतचे कोटेशन प्रतिवादी क्र. ३ यांचेकडून प्रतिवादी कंपनीने भरुन घेतलेले आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केलेली आहे.

९. तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे कथनानुसार, दावा अ मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. तसेच गट नंबर २४६ क्षेत्र ७ आर यापैकी २ आणे ८ पै चा हिस्सा, तसेच गट नंबर २३१ क्षेत्र ४७ आर यापैकी ८ आणेचा हिस्सा या शेत मिळकतीदेखील वादी-प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांच्या वडिलोपार्जित शेतमिळकती आहेत. सदर शेतमिळकतींबाबत वादी-प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचेत कायदेशीर

वाटप झालेले नव्हते. सदरच्या सर्व मिळकतींमध्ये वादी, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची समाईकात सोयीनुसार प्रत्येकी १/५ हिश्श्याप्रमाणे कब्जेवहिवाट होती व आहे. त्याप्रमाणे सातबारा रेकॉर्डसदरी प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचे नावाच्या नोंदी आहेत. गट नंबर २४६ या मिळकतीमध्ये वादी, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचेशिवाय अन्य सहहिस्सेदारांच्या मालकीची पूर्वीपासून विहीर होती व त्या विहिरीवर दावा अ मिळकत व गट नंबर २३१ या मिळकती बागायती होत्या. परंतु सध्या गट नंबर २४६ मधील अन्य सहहिस्सेदार व वादी, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचेत सदर विहीरीतील गाळ काढणेवरुन तसेच वीज बिलाबाबत वाद होवू लागले. म्हणून वादी, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी सर्वांनी दावा अ मिळकतीमध्ये नवीन विहीर समाईकात खुदाई करणेचे ठरवले. त्याप्रमाणे सर्वांनी समाईकात ३ आणे २.४० पै हिश्श्याने खर्च करुन दावा अ मिळकतीमध्ये २०१४ साली नवीन विहीर खुदाई केली.

१०. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी ऐतवडे बुद्रुक हद्दीतील ४ एकर क्षेत्रासाठी देवर्डे, ता. वाळवा येथून वारणा नदीतून पाणी उपसा योजना करुन नवीन पाईपलाईन केलेली आहे. परंतु त्याचा अद्याप शासकीय पाणी उपसा परवाना वादीस मिळालेला नाही. म्हणून गट नं. २४६ मधील विहीरीवर वादी व त्यांचे मुलांनी बोगस व बनावट कागदपत्रांचे आधारे वादीचे वडीलांच्या नावे ३ हॉर्स पॉवर नवीन वीज कनेक्शन मंजूर करुन घेतले. परंतु सदरची विहिर ही मुजून गेल्याने वादींनी प्रतिवादी क्र. १ व २ यांचे मदतीने दावा मिळकतीमधील दोन्ही वीज कनेक्शनचा वापर करुन गट नंबर २४७ मधील नवीन विहीरीतून पाणी उपसा करणेसाठी मोटारी नवीन विहीरीमध्ये सोडल्या असता त्यांचेमध्ये वाद होवू लागले. म्हणून प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी सातबारा रेकॉर्ड काढून पाहिले असता वादी यांनी प्रतिवादींचे अपरोक्ष बेकायदेशीरपणे नवीन विहीर त्यांचे नावे नोंद केलेची माहिती मिळाली. त्यानंतर प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द तक्रारी अर्ज देवून त्याची योग्य ती चौकशी होवून सदरची नवीन विहीरीस असलेली वादीची नोंद रद्द झालेली आहे.

११. प्रतिवादी यांनी वादीचे नावे असलेल्या कनेक्शनबाबत चौकशी केली असता वादी व त्यांचे मुलांनी बेकायदेशीरपणे व बोगस बनावट कागदपत्रांद्वारे वीज कनेक्शन मंजूर करुन घेतल्याचे त्यांना समजले. त्यामुळे प्रतिवादी यांनी ते कनेक्शन बंद केले. त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांचेकडे नवीन वीज कनेक्शन मिळणेकरीता पाठपुरावा केला असता त्यांनी सर्व कागदोपत्री माहिती घेवून व कायेदशीर

बाबी तपासून गट नंबर २४७ च्या सातबारा पत्रकी नोंद असणा-या कोणत्याही हिस्सेदाराचे नावे वीज कनेक्शन मागणी केलेस एकमेकांचे संमतीशिवाय वीज कनेक्शन मंजूर करणेबाबत निर्णय घेतला. सबब, प्रतिवादी यांचे नवीन वीज कनेक्शन जोडणीबाबतची सर्व पूर्तता झाल्याचे वैषम्य वाटून वादींनी जो एकतर्फा स्थगितीचा आदेश मिळवला आहे तो रद्द होण्यास पात्र आहे असे त्यांचे कथन आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी यांना वीज कनेक्शन न दिलेस प्रतिवादी यांचे अपरिमित व पैशाने कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे, त्यामुळे वादींचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी मागणी प्रतिवादींनी केली आहे.

१२. अर्जातील कथने व म्हणणे यातील कथनांचा विचार केला. तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. यावरुन वादाचे खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय? | होय. |
| २. | वादीस तुर्तातुर्त ताकीद मंजूर न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | होय. |
| ३. | न्यायाचा तराजू वादीचे बाजुने झुकतो काय? | होय. |
| ४. | काय आदेश ? | वादीचा अर्ज मंजूर करण्यात आला. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**मुद्दा क्र. १ ते ३**

१३. वादीने त्याचे अर्जातील कथनांचे पृष्टयर्थ याकामी निशाणी ८ सोबत दावा मिळकतीचा सातबारा दाखल केला आहे. त्यामध्ये गट नंबर २४७ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांची समाईकात कब्जे वहिवाट दिसून येत आहे. तसेच पिक-पाण्याच्या नोंद वहीस २०१५-१६ साली विहीरपड समाईकात दिसून येत आहे. तसेच वादीने निशाणी ९ खाली गट नंबर २४७ चा सातबारा दाखल केला आहे. त्यामध्ये पिकाच्या नोंद वहीस २०१३-१४ तसेच २०१४-१५ या साली वादी यांची विहीरपड अशी नोंद दिसून येत

आहे. तसेच वादीने निशाणी ४ अ.क्र. ३ वर त्याचे नावे असणारे महावितरण विद्युत कंपनीचे विद्युत बिल दाखल केलेले आहे. ते बिल २०१६ चे दिसून येत आहे. त्यावर गट नंबर २४७ अशी नोंद दिसून येत आहे. तसेच त्यास मंजूर भार १२ हॉर्स पॉवर असा दिसून येत आहे. तसेच वादीने अ.क्र. ४ ला १२ हॉर्स पॉवर मोटर खरेदी घेतली हे दाखवण्यासाठी बाहुबली इलेक्ट्रीकल्स यांचे बिल दाखल केले आहे. तसेच दावा मिळकतीचे विहीरीचे फोटोग्राफ्स व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अ.क्र. ५ व ६ ला दाखल केलेले आहे. वादीने या कामी प्रतिवादी क्र. ६ बरोबर केलेले संमती करारपत्र निशाणी ४ अ.क्र. ८ वर दाखल केलेले दिसून येत आहे. त्यामध्ये वादींनी त्याचे वाटपास आलेल्या मिळकतीमध्ये स्वखर्चाने सन २०१४ साली विहीर खुदाई व बांधकाम गट नंबर २४७ मध्ये केले असल्याचे नमूद केलेले आहे व त्या विहीर खुदाईस प्रतिवादी क्र. ६ तसेच इतर प्रतिवादींनी संपूर्ण संमती दिलेली होती असा मजकूर दिसून येत आहे. परंतु सदरचे करारपत्र हे वादी व प्रतिवादी क्र. ६ यांचेमधील दिसून येत आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी पुरावा म्हणून ते केवळ प्रतिवादी क्र. ६ वर बंधनकारक दिसून येत आहे. तसेच वादीने निशाणी ४ अ.क्र. ९ वर प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचेकडून गट नंबर २४७ यामधील विहीर, यामधील असणारा १ आणे हिस्सा व त्या हिश्श्याने विहीरीचे पाणी पाळीप्रमाणे उपसा करणेच्या हक्कासह वादीने करुन घेतलेले नोंदणीकृत खरेदीपत्र दि. ०५/०९/२०१५ चे दाखल केलेले आहे.

१४. तसेच वादीने निशाणी ६३ च्या कागदयादीसोबत काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये वादीचा मुलगा चंद्रशेखर याचे बँक ऑफ इंडियाच्या खात्याचा उतारा अ.क्र. ५ व ६ वर दाखल केलेला आहे. तसेच वादीने अ.क्र. ८ वर राजेंद्र निळकंठ पाटील यांनी केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदरच्या प्रतिज्ञापत्रात राजेंद्र निळकंठ पाटील यांनी दि. २७/०३/२०१४ रोजी वादीचे गट नंबर २४७ मधील विहीर त्याचे पोकलँडने खोदली असून त्यावेळेस कोणीही हरकत घेतली नव्हती असा मजकूर नमूद केलेला आहे. तसेच अ.क्र. ९ वर महेश तानाजी जाधव यांनी तहसीलदार व तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये देखील असा मजकूर दिसून येत आहे की, त्यांनी गट नंबर २४७ मध्ये विहीरीचे बांधकाम केलेले आहे. ते बांधकाम करीत असताना कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नव्हती. सदरचे प्रतिज्ञापत्र हे दि.०३/०९/२०१५ रोजी केल्याचे दिसून येत आहे. तसेच अ.क्र. ११ वर वादीने तहसीलदार, वाळवा यांना दि. ०८/११/२०१६ रोजी गट नंबर २४७ च्या सातबा-यामधील नमुना १२ मध्ये त्यांचे २ आर क्षेत्रातील विहीरपड याचे नाव कमी झाल्याबाबत

पुढील योग्य कार्यवाही करणेसाठी दिलेला अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर तहसीलदार कार्यालय, इस्लामपूर यांची दि. १५/११/२०१६ ची पोहोच दिसून येत आहे. अशा प्रकारे वादीने गट नंबर २४७ मधील विहीर समाईकात नसून त्याचे एकट्याचे ताब्यात आहे हे दाखवण्यासाठी वरील कागदोपत्री पुरावा न्यायालयामोर आणलेला आहे. परंतु त्याचबरोबर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी कोणता कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे हे पाहणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

१५. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी ६१ च्या कागदयादीसोबत तलाठी, करंजवडे यांचा दि. २२/०६/२०१७ रोजीचा दाखला दाखल केलेला आहे. त्यामध्ये गट नंबर २४७ मध्ये २ आर क्षेत्रात समाईक विहीरपड आहे असे नमूद केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी निशाणी ७२ च्या कागदयादीसोबत काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये अ.क्र. १ ला प्रतिवादी क्र. ३ यांचे नावे साई इलेक्ट्रीकल्स यांचे ३ एच पी मोटार खरेदी केल्याचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे बिल दिसून येत आहे. तसेच अ.क्र. २ वर दि. ०३/०७/२०१७ रोजीचे कृष्णा ट्रेडर्सचे बिल दिसून येत आहे. तसेच त्यांनी दावा ब मिळकतीत बसवलेली नवीन मोटर पंपचा देखील फोटो अ.क्र. ४ वर दाखल केले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे असे कथन आहे की, वादीने जे विद्युत वितरण कंपनीचे गट नंबर २४७ चे विद्युत बिल दाखल केलेल आहे तेवढे एकच बील प्रतिवादी क्र. १ व २ यांचेकडून चुकून गट नंबर २४७ असे नमूद करुन दिले गेलेले आहे. परंतु बाकी सर्व बिले ही गट नंबर २४६ बाबतची आहेत. म्हणून त्यांनी अ.क्र. ५ वर वादीनेच दाखल केलेले विद्युत बिल दाखल केलेले आहे. तसेच अ.क्र. ६ वर डुप्लीकेट बिल दाखल केलेले आहे. ते दि. ३१/०३/२०१६ ते दि. ३०/०६/२०१६ या कालावधीतील आहे. त्यावर वादीचे नाव दिसून येत आहे. परंतु गट नंबर २४६ असा दिसून येत आहे व विद्युत भार २० हॉर्स पॉवर असा दिसून येत आहे. त्याच मजकुराची अ.क्र. ७ व ८ ला दोन बिले प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी दाखल केलेली आहेत.

१६. वरील सर्व कागदपत्रांचा विचार करता न्यायालयाचे असे मत आहे की, खालील कथनांचा विचार करता, वादीच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचेमध्ये पूर्वीच वाटप झालेले आहे व त्याप्रमाणे त्या त्या मिळकतीत ज्याची त्याची वहिवाट आहे व त्याप्रमाणे गट नंबर २४७ मध्ये वादीची वहिवाट आहे. परंतु प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत अथवा अन्य वडिलार्जित मिळकतींचे वादी-प्रतिवादी

यांचेत अद्याप वाटप झालेले नाही व त्यामध्ये सर्वांची समाईकात मालकी आहे. सर्व कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की वाटपाबाबत वादीने सद्य स्थितीला कोणताही प्रथमदर्शनी पुरावा आणलेला नाही. परंतु वादीने गट नंबर २४७ चा जो सातबारा दाखल केला आहे त्याच्या नमुना १२ ला २०१३-१४ व २०१४-१५ साली वादीचे नावाची विहीरपड म्हणून नोंद दिसून येत आहे व ती विहीर वादीनेच खुदाई केली हे दाखवणारी अनेक कागदपत्रे वादीने दाखल केलेली आहेत. सद्य स्थितीला प्रथमदर्शनी पुरावा म्हणून तेवढी कागदपत्रे पुरेशी आहेत. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी म्हणणे पान क्र. ६ वर हे कबूल केले आहे की प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी वादीवर विश्वास ठेवून १२.५ हॉर्स पॉवर चे कनेक्शन गट नंबर २४७ मधील विहीरीवर जोडणेस संमती दिली व त्याप्रमाणे वादीने त्या विहीरीतील पाणी ऐतवडे बुद्रुक हद्दीतील त्याचे मिळकतींना घेतले. परंतु प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे असे कथन आहे की ती संमती त्यांनी वादी यास पाणी भाडयाने घेण्याच्या अटीवर दिलेली होती. परंतु प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी सदर कथनाचे पृष्टयर्थ कोणताही प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. त्यामुळे वादीच्या कथनामध्ये तथ्य दिसून येत आहे. जरी गट नंबर २४७ मधील दावा ब मिळकतीमध्ये वादीची संपूर्ण मालकी आहे हे दाखवणारा थेट पुरावा न्यायालयासमोर आला नसला तरीही जी कागदपत्रे वादीने दाखल केली आहेत त्यावरुन वादीने गट नंबर २४७ मध्ये विहीर खुदाई केल्याचे व त्याठिकाणी १२ हॉर्स पॉवरची मोटार लावल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. ती विहीर खुदाई करीत असताना प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी खर्च केल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. अशा परिस्थितीत वादीच्या कथनावर अवलंबून राहणे हे उचित वाटत आहे त्यामुळे गट नं. २४७ मधील विहीरीवर वादीचा एकट्याचा हक्क असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे दावा ब मिळकतीत सामाईक कब्जा असल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा दिसून येत नाही.

१७. वादीने त्याचे युक्तीवादाचे पृष्टयर्थ खालील न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

***2006(5) Mh.L.J. 218 ( Cap.b) Seema Arshad Zaheer & others v/s Municipal Corporation of Gr. Mumbai & others.***

***b) Civil Procedure Code, O. 39 R. 1*** *– Temporary injunction – Exercise of discretion to grant- Requirements.*

*The discretion of the Court is exercised to grant a temporaty injuction only when the following requirements are*

*made out by the plaintiff : (i) existance of a prima facie case as pleaded, necessitating protection of the plaintiff's rights by issue of a temporaty injunction ; (ii) when the need for protection of the plaintiff's right is compared with or weighed against the need for protection of the defendant's rights or likely infringement of the defendant's rights, the balance of convenience tilting in favour of the plaintiff ; (iii) clear possibility of irreparable injury being caused to the plaintiff if the temporary injuction is not granted. In addition, temporary injunction being an equitale relief, the discretion to grant such relief will be exercised only when the plaintiff's conduct is free from blame and he approaches the Court with clean hands.*

तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी खालील न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

**1. AIR 2011 ALLAHABAD 83**

*“ Every co-sharer has a right to the property and to develop the property in accordance with the law, suject to the condition that such use of the property will not render the partition impossible.”*

**2. AIR 2006 S.C. 3275**

*“ Application for injunction- Finding on ' prima facie case' - Would be a finding of fact- However, while arriving at such finding of fact, Court not only must arrive at a conclusion that a case for trial has been made out but would consider question in regard to balance of convenience of parties as also irreparable injury which might be suffered by plaintiffs if prayer for injunction is to be refused- While making endeavours to find out a prima facie case, in partition suit the Court could take into consideration extent of plaintiffs' share in property, if any- Court would take into consideration as to whether plaintiffs have pre-varicated their stand from stage to stage.”*

वरील सर्व न्यायनिर्णयांचा आधार घेतला असता वादीस प्रथमदर्शनी केस असल्याचे स्पष्ट होत आहे. परंतु तुर्तातुर्त ताकीद अर्ज निर्णयित करीत असताना केवळ

प्रथमदर्शनी केस एवढीच बाब सिध्द होवून ताकीद मिळू शकत नाही. त्यासाठी कधीही पैशाने न भरुन येणारे नुकसन व बॅलन्स ऑफ कनव्हीनियंस या दोन बाबी सुध्दा सिध्द होणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये न्यायालयाचे असे मत आहे की सद्य स्थितीला वादी मागणी करतो त्याप्रमाणे तुर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादीचा दावा हा फेल ठरणार आहे. त्यामुळे वादीला त्याचा दावा गुणदोषावर व पुराव्याने सिध्द करणे अवघड होणार आहे व त्याची संधी वादीस मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसेच तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास व त्यावर प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वीज कनेक्शन दिल्यास व दाव्याचे अंतिम निकालाच्या वेळेस दावा वादीचे हक्कात झाल्यास वादीचे झालेले नुकसान हे पैशात न भरुन येणारे असणार आहे. कारण त्याचे मोजमाप करणे हे अशक्य असणार आहे. तसेच त्यामुळे नसलेले हक्क निर्माण होण्याची शक्यता दिसून येत आहे. व त्यामुळे अनेक वाद निर्माण होण्याची शक्यता दिसून येत आहे. या सर्व बाबींमुळे न्यायाचा तराजू हा वादीचेच बाजूने झुकताना दिसून येत आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ४**

१८. मुद्दा क्र. १ ते ३ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे व त्यावर निष्कर्ष दिल्याप्रमाणे मुद्दा क्र. ४ चे उत्तर खालील आदेश पारित करुन देण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांना अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे की त्यांनी दाव्याचा अंतिम निकाल होईतोपर्यंत प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना बेकायदेशीरपणे दावा ब मिळकतीमध्ये वीज कनेक्शन देवू नये.

सही/--

इस्लामपूर. पी.जी.इनामदार

दि. ०१/०९/२०१७ तिसरे सहदिवाणी न्यायाधीश, इस्लामपूर